Estd. 1962"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विषय:— सन २०२६—२७ मध्ये पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना नावनोंदणी पत्र देणेबाबत करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात.....

सर्व संबंधितांना आदेशान्वये कळविणेत येते की, पीएच.डी. अभ्यासक्रमाकरीता प्रवेशित होणा—या विद्यार्थ्यांबाबत प्रवेश प्रक्रिया व नावनोंदणी बाबत कार्यवाही संबंधित संशोधन सल्लागार समिती मार्फत पूर्ण करण्यात येते. त्यानंतर विद्यार्थ्यांना संशोधन व मान्यता समितीच्या मान्यतेने नावनोंदणी पत्र देण्यात येते. सदर कार्यवाहीची पूर्तता करत असताना, मार्गदर्शक नियुक्तीनंतर विद्यार्थ्यांचे संशोधन सल्लागार समितीमार्फत सिनॉपसीस सादरीकरण व मान्यता, आरपीईची पूर्तता, पात्रता अर्ज भरुन घेवून पात्रता पूर्ण करणे, त्यानंतर संशोधन व मान्यता समितीची संशोधन प्रस्तावास मान्यता घेणे व नावनोंदणी पत्र देणे या प्रक्रियेसाठी बराच कालावधी लागत असल्याचे दिसून येत आहे.

तेव्हा उपरोक्त कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने संबंधित विभाग, अधिविभाग व संशोधक विद्यार्थी यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही पूर्ण करावयाची आहे. त्याचप्रमाणे याकरीता देण्यात आलेल्या मुदतीचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.

१. संबंधित अधिविभागातील विषयाच्या संशोधन सल्लागार समितीने पीएच.डी. प्रवेश परीक्षेची अंतिम गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर, १५ दिवसात मार्गदर्शक नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण करुन, संगणक प्रणालीद्वारे जनरेट झालेले तात्पुरते प्रवेश पत्र विद्यार्थ्यांना पाठवावे. प्रोव्हिजनल प्रवेश पत्राचा सुधारित मसुदा सोबत जोडला आहे.

२. तेथून पुढे संबंधित विद्यार्थ्यांनी शोध प्रबंधाचे सिनॉपसीस, पात्रता अर्ज, फी व अन्य कागदपत्रे संबंधित अधिविभागास/विभागास (आवश्यक तेथे) संगणक प्रणालीद्वारे प्रोव्हिजनल प्रवेश पत्राच्या दिनांकापासून ४५ दिवसाच्या आत सादर करावीत. जे विद्यार्थी ४५ दिवसात वरील कागदपत्रांची पूर्तता करणार नाहीत, त्यांचे प्रवेश संशोधन सल्लागार समितीने रदद करावेत. तेंव्हा, विद्यार्थ्यांनी नियोजित कालावधीत सिनॉपसीस सादर करणे, पात्रता अर्जाची पूर्तता करणे (विहित शुल्कासह), इत्यादी सर्व कामे वर नमुद केलेल्या कालावधीमध्ये पूर्ण करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे संशोधन सल्लागार समितीने संबंधित विद्यार्थ्यांना निर्धारित वेळेचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सूचना देणे आवश्यक आहे.

३. पात्रता विभागाकडून पीएच.डी. विद्यार्थ्यांची पात्रता वेळेत पूर्ण होणेबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे. तेव्हा पात्रता विभागाने सदर विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज सादर झाल्यापासून एक महिन्यात संगणक प्रणालीमधून पात्रता (पात्र/अपात्र) पूर्ण करणे आवश्यक आहे. अपात्रता कारणासह कळविण्यात यावी.

४. संशोधन सल्लागार समितीसमोर विद्यार्थ्यांने सिनॉपसीस सादर केल्यानंतर, १५ दिवसात सिनॉपसीस मंजूरीची प्रक्रिया संबधित अधिविभाग/संशोधन सल्लागार समिती यांनी पूर्ण करुन व पीजीबीयुटीआर संगणक प्रणालीमध्ये मंजूर झालेला सिनॉपसीस अपलोड करणेबाबत कार्यवाही विहित मुदतीमध्ये पूर्ण करणे आवश्यक आहे. सिनॉपसीस मध्ये संशोधन सल्लागार समितीने सुधारणा सुचविली असल्यास, संबंधित विद्यार्थ्यांने संशोधन व सल्लागार समितीच्या बैठकीच्या दिनांकापासून पुढील १५ दिवसात सुधारित सिनॉपसीस सादर करणे व त्यानंतर पुढील १५ दिवसात संशोधन सल्लागार समितीने बैठक आयोजित करुन सिनॉपसीसला मंजूरी देणे बंधनकारक असेल.

५. संबंधित अधिविभाग यांचेकडून सिनॉपसीस मंजुरीचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर, पीजीबीयुटीआर विभागाने संशोधन व मान्यता समितीच्या मंजुरीने विद्यार्थ्यांना सर्व आवश्यक बाबींची पूर्तता झाल्यानंतर नावनोंदणी पत्र देण्याची कार्यवाही ४५ दिवसात पूर्ण करणे आवश्यक राहील.

तेव्हा सर्व संबंधितांनी सन २०२६—२७ मध्ये वरील कामकाजाची पूर्तता खालील वेळापत्रकाप्रमाणे पूर्ण करणे आवश्यक आहे.

| Sr.No | Section / Student | Compliances | Timeline |
|---|---|---|---|
| 1 | Exam/Comp centre | प्रवेश परीक्षा अंतिम गुणवत्ता यादी | 05 November 2026 |
| 2 | Department/ RAC | आरएसी बैठक (Guide Allotment and Provisional Admission Letter) | 06 November 2026 to 07 December 2026 |
| 3 | Student | Submission of Eligibility Fee & Form | 08 December 2026 to 22 January 2027 |
| 4 | Student | Submission of Synopsis | 08 December 2026 to 22 January 2027 |
| 5 | Department/ RAC | Research Advisory Committee (Synopsis Approval) | 23 January 2027 to 06 February 2027 |
| 6 | Eligibility | Eligibility Clearance | 23 January 2027 to 22 February 2027 |
| 7 | RPE | Academic Department/Ph.D. Co-ordinator of Engg. & Technology | 08 December 2026 to 08 March 2027 |
| 8 | Student/ Department | Uploading Synopsis into Software System | 08 February 2027 to 22 February 2027 |
| 9 | Student | Revised Synopsis Submission | 15 February 2027 to 02 March 2027 |
| 10 | Department/ RAC | RAC Approval to Revised Synopsis | 03 March 2027 to 17 March 2027 |
| 11 | BUTR | Research And Recognition Committee Meeting for Synopsis Approval | 20 February 2027 to 25 March 2027 |
| 12 | BUTR | Registration Letter | 27 March to 2027 12 April 2027 |

वरील बाबींची सर्व संबंधित अधिविभाग/विभाग व संशोधक विद्यार्थ्यांनी वरील वेळापत्रकाची नोंद घेवून त्याप्रमाणे सर्व कार्यवाही पूर्ण करावी.

आदेशावरुन,

कुलसचिव

जा.क्र. शिवाजी विद्या/पीजी—बीयुटीआर/पीएच.डी/9706
दि— 15 OCT 2026

प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक, पदव्युत्तर अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

प्रत:—

१. मा.कुलगुरु, प्र.कुलगुरु, कुलसचिव व प्र—संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ कार्यालय
२. प्र—अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा
३. प्र—संचालक, संगणक केंद्र.
४. पात्रता विभाग.
५. इंटरनेट विभाग यांना सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत योग्य त्या कार्यवाहीसाठी.

(महत्वाची सूचना: १.सोबतचे परिपत्रक अधिविभागातील/संलग्न महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे.
२. पीएच.डी. विद्यार्थ्यांनी तसेच संबंधित अधिविभाग/विभागातील संशोधक मार्गदर्शक यांनी पीजीबीयुटीआर विभागाशी निगडीत अधिकृत माहितीकरीता विद्यापीठाच्या संकेतस्थळावर भेट दयावी. तसेच याबाबतचे सर्व कामकाज पीजीबीयुटीआर विभागाच्या संगणक प्रणालीतून पूर्ण करावे.)